# १५ वा वित्त आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, शहरी व ग्रामीण भागांकरिता
# वैद्यकिय अधिकारी पदभरती जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली

जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी, सांगली, मार्फत नव्याने स्थापन झालेल्या यू.एच.डब्ल्यू.सी. करिता खालील नमुद केलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे एकत्रित मानधनावर कंत्राटी रिक्त पदांची भरती करावयाची आहे.

थेट मुलाखतीद्वारे

| अ. क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक अर्हता | वय | एकुण पद संख्या | प्रवर्ग | प्रतिमहा एकत्रित मानधन | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | MBBS | राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे / खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे | २६ | अ.जा.- ४<br>अ.ज.- २<br>वि.जा.अ - १<br>भ.ज.क - १<br>वि.मा.प्र. - १<br>इ.मा.व. - ४<br>ईडब्ल्युएस- ३<br>खुला - १० | ६०००० | महानगर पालिका- १४<br>आष्टा - १<br>जत- २<br>पलूस - १<br>विटा - ३<br>शिराळा - १<br>क.महांकाळ- १<br>कडेगांव - १<br>इस्लामपूर -२ |

## अटी व शर्ती

१) सदरची पदे निव्वळ कंत्राटी स्वरुपाची पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. शासकीय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणासंबंधी दावा करणेचे अधिकार राहणार नाहीत.

२) आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास, त्या पदांकरीता असलेली पात्रता, अनुभव व अर्हता शिथिल करणेचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.

३) पदांसाठी नमुद मानधन हे एकत्रित मासिक मानधन आहे.

४) उच्च शैक्षणिक अर्हता असणाऱ्या व अनुभवी उमेदवारांना प्राधान्य देणेत येईल.

५) निवड झालेल्या उमेदवारास २९ जुन २०२३ अखेर नियुक्ती देणेत येईल.

६) उमेदवाराने अर्ज, मुळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रतीसह थेट मुलाखतीस उपस्थित रहावे.

७) अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखत घेणेत येईल.

८) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील व शासकीय निवृत्त एम.बी.बी.एस. यांची वयोमर्यादा ७० वर्षे राहील. वय वर्षे ६० नंतर प्रत्येक वर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

९) शासकीय,निमशासकीय, अंगीकृत संस्था तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचा विचार निवडप्रक्रियेत करणेत येईल.

१०) दवाखान्याची वेळ ही दु २.०० ते रात्री १०.०० अशी असेल तसेच रिक्त पदे पूर्ण भरेपर्यत किंवा पुढील आदेश येईपर्यंत महिन्यातील प्रत्येक सोमवारी Walk in interviwe घेण्यात येईल.

११) अर्जदाराने अर्ज **A4** आकाराच्या कोऱ्या कागदावर करावयाचा असून त्यामध्ये खालील बाबी अंतर्गत असाव्यात.

१. अर्ज केलेल्या पदाचे नाव २. अर्जदाराचे नाव ३. अर्जदाराचा पत्ता ४. दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक (अनिवार्य) ५. ईमेल आयडी ६. जन्मतारीख ७. कामाचा अनुभव - काम केलेली संस्था, धारण केलेले पद, कालावधी, पदाची जबाबदारी व वेतन ८. शैक्षणिक अर्हतेची संपूर्ण माहिती - अभ्यासक्रमाचे नाव, संस्था/विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेचे वर्षे, गुणांचा तपशील व टक्केवारी ९.

२. आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व मुळ कागदपत्रे खालीलप्रमाणे - १. शैक्षणिक अर्हतेची सर्व प्रमाणपत्रे व सर्व गुणपत्रके २. शाळा सोडल्याचा दाखला / जन्म तारखेचा दाखला ३. जातीचा दाखला व जात वैद्यता पडताळणी प्रमाणपत्र ४. अनुभव प्रमाणपत्र ५. कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र

अर्ज छाननीनंतर मुलाखतीला बोलवण्यात येईल.

सही/-
सदस्य निवड समिती
तथा जिल्हा शल्यचिकित्सक
सांगली.

सही/-
सदस्य सचिव निवड समिती
तथा जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, सांगली

सही/-
अध्यक्ष निवड समिती
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली